Vol 5 Issue 1 Oct 2015

ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

Ashok Yakkaldevi
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Sanjeev Kumar Mishra

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

**Review Of Research**
**ISSN 2249-894X**

**Impact Factor : 3.1402(UIF)**
**Volume - 5 | Issue - 1 | Oct - 2015**

# ब्रिटीशांच्या विरोधातील संथाळांचा उठाव: एक अभ्यास

गौतम गोविंद सोनवणे
एस. बी. कॉलेज, शहापूर.

सार ः

भूप्रदेशाने विशाल व बहुविविधतेने नटलेल्या आपल्या भारत देशात प्राचीन काळापासून अनेक प्रकारच्या आदिवासी जमाती वास्तव्य करीत आहेत. त्यातील संथाळ ही आदिवासी जमात शेती व्यवसायाशी जास्त संलग्न असलेली दिसते. यांच्या दैनंदिन जीवनामध्ये ब्रिटीश काळात ब्रिटीश अधिकारी व ब्रिटीशांचे हस्तक जमीनदार यांचा हस्तक्षेप जस जसा वाढत गेला,तस तसा हा समाज एकजूट बनू लागला. बाहेरच्या लोकांना संथाळ लोक 'दिकू' म्हणत असत, अशा दिकुंच्या विरोधात संथाळांनी इ. स. 1855 ते 1857 या दरम्यान प्रखर संघर्ष केला. संथाळांचा उठाव स्वयंस्फुर्त भावनेतून केलेला व अतिशय तीव्र स्वरूपाने केलेला उठाव होता. भारतीय इतिहासामध्ये ब्रिटीशांच्या विरोधात संस्थाळांनी केलेला हा उठाव अत्यंत प्रखर स्वरूपाचा व दीर्घ कालावधीचा होता. संथाळांच्या या उठावाच्या शौर्य गाथा आजही राजमहल परिसरामध्ये लोककथांमधून व लोकगीतांमधून ऐकावयास मिळतात.




## प्रस्तावना ः

भारतासारख्या विशाल व बहुविविधतेने नटलेल्या देशात अनेक आदिवासी जमाती आहेत. लोकसंख्येच्या दृष्टीने मध्यप्रदेश या राज्यात सर्वात जास्त आदिवासी लोक राहतात. एकूण लोकसंख्येच्या शेकडा प्रमाणाच्या दृष्टीने पूर्वोत्तर राज्यांमधील मिझोरम राज्यात हे प्रमाण 93ट पेक्षा जास्त आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये एकूण 583 आदिवासी जमातींची सूची आहे. जी ब्रिटिश कालखंडामध्ये त्यांनी अपराधी जमातींच्या कायद्यांतर्गत निर्दिष्ट केली होती. वास्तवात भारतातील आदिवासी जमातींची संख्या 1084 एवढी आहे, ही संख्या निर्दिष्ट आदिवासी जमातींच्या ओळखीवरून तयार केलेली आहे. भारतातील एवढया मोठया संख्येच्या जमातींना येथील मूळचे रहिवाशी किंवा आदिवासी म्हणून संबोधले जाते. या आदिवासी जमाती प्रामुख्याने जंगल, डोंगरदया अशा प्रदेशात वास्तव्य करतात. बाहय संस्कृतीपासून व जगापासून या आदिवासी जमातींनी हजारो वर्ष स्वतःला अलिप्त ठेवल्याचे दिसून येते. ऐतदेशीय प्राचीन व मध्ययुगीन काळातील शासकांबरोवर या आदिवासी समाजांचे क्वचित संबंध येत असत.

भारतामध्ये व्यापारी म्हणून आलेल्या ब्रिटिशांनी इ. स. 1757 च्या प्लासी लढाईतील विजयापासून ते इ. स. 1857 पर्यंतच्या 100 वर्षाच्या कालखंडामध्ये भारताच्या 60% भूभागावर प्रत्यक्षपणे सत्ता स्थापन केली. ब्रिटिश काळामध्ये ब्रिटिश अधिकारी व त्यांचे हस्तक जमीनदार आणि महाजन यांच्या आदिवासी क्षेत्रातील वाढत्या हस्तक्षेपाने अनेक संघर्ष घडून आले. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनामध्ये कित्येक आदिवासी जमातींनी महत्वपूर्ण योगदान दिले होते. परंतु त्यांच्या या कार्याकडे अनेक वर्ष ब्रिटिश रेकॉर्डस्मधील गुन्हेगारी कृत्याच्या दृष्टीकोनातून पाहिले गेले होते. या आदिवासी जमातींच्या कार्यावर खया अर्थाने प्रकाश सबाल्टर्नवादी इतिहासलेखनातून पडला. त्यातून संथाळ, गोंड, भिल्ल, रम्पा, कोळी, नाग, ओहोम, ऊराँव, खासी इत्यादींच्या कार्याचे वास्तविक स्वरूप समोर आले. त्यातील संथाळ आदिवासी जमातीने ब्रिटिश अधिकारी,जमीनदार व महाजनांच्या विरोधात 1855 ते 1857 या प्रदीर्घ कालखंडात प्रखर संघर्ष केला. एकीकडे अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी परिपूर्ण ब्रिटिश फौज व दुसरीकडे पारंपारिक धनुष्य,भाले,तलवारी शस्त्रास्त्रे असणारे संथाळ आदिवासी असे हे या संघर्षाचे परस्पर विरोधी टोके होती. तरीही संथाळांनी आपापसातील ऐक्य, नियोजन, गुप्तता, गनिमी कावा इत्यादींच्या बळावर ब्रिटिशांशी प्रदीर्घ संघर्ष केला, प्रदीर्घ काळ चाललेल्या या संघर्षात शेवटी ब्रिटिशांनी अमानुष पध्दतीने अत्याचार करून हा संथाळांचा उठाव नियंत्रित केला.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये ः

संथाळ या आदिवासी समाजाच्या 1855 ते 1857 या दरम्यानच्या ब्रिटिश विरोधी संघर्षाचा अभ्यास करण्यासाठी पुढील उद्दिष्ट्ये ठेवलेली आहेत.

1. संथाळ या आदिवासी समाजाची जीवनपध्दती अभ्यासणे.

2 . संथाळांच्या जीवनातील ब्रिटिशांच्या हस्तक्षेपाचा अभ्यास करणे .

3 . ब्रिटिशांच्या विरोधातील संथाळांच्या उठावाचे स्वरूप समजुन घेणे .

संथाळ आदिवासी समाजाची जीवन पध्दती ः

भारतातील बहुतांश आदिवासी जमाती हया जंगली व डोंगराळ परिसरामध्ये वास्तव्य करतात . त्यांची जीवनपध्दती शिकार,झुम शेती (स्थलांतरीत शेती ), फळे कंदमुळे इत्यादींशी संबंधीत असते . त्यातील संथाळ आदिवासी समाजाची जीवनपध्दती जास्तीत जास्त शेतीशी संलग्न होती, त्यामुळे त्यांचे जीवन इतर आदिवासी समाजापेक्षा थोडे सुधारलेले होते . भारतामध्ये संथाळाचे वास्तव्य मोठया प्रमाणावर राजमहल पर्वतशृंखलेच्या सपाटी प्रदेशामध्ये आहे . ब्रिटिशांच्या बोलावण्यावरून भारताच्या इतर भागातील संथाळ या राजमहल प्रदेशामध्ये इ . स . 1780 पासून एकवटू लागले होते . इ . स . 1832 पर्यंत त्या भागामध्ये ब्रिटिशांनी संथाळांना मोठयाप्रमाणावर जमीनी देवून ते क्षेत्र संथाळांची भूमी म्हणून घोषित केले . त्यांच्या भूमीच्या चारही बाजूंनी खांब उभे करून त्या भूमीची सीमा निश्चित केली गेली . संथाळांच्या या भागलपूरपासून ते राजमहाल पर्येतच्या मधील भूमीला 'दामिन ए कोह ' हे नाव देण्यात आल . "[1] संथाळ लोकांना प्रथम या भागातील पहाडी आदिवासी लोकांबरोबर संघर्ष करावा लागला . त्यांना पराभूत करून पर्वतश्रेणींच्या आतील भागत हुसकावून लावण्यात संथाळांना यश आले . त्यानंतर जवळ जवळ दहा वर्ष त्या भागातील जंगलतोड करून ती जमीन शेतीयोग्य करण्यासाठी लागली होती . इ . स . 1851 पर्यंत त्या भागातील संथाळांच्या गावांची संख्या 1473 पर्यंत पोहोचली होती,आणि त्यांची लोकसंख्या 82000 पर्यंत वाढलेली होती . त्यामुळे जस जसा शेतीचा विस्तार होत गेला तसतशी ब्रिटिशांच्या महसूलात वाढ होत गेली . त्या भागातून मोठया प्रमाणावर महसूल गोळा करण्यासाठी ब्रिटिश अधिकारी व महाजनांच्या हस्तक्षेपातही मोठी वृध्दी होऊ लागली होती .

संथाळांच्या जीवनातील ब्रिटीशांचा वाढता हस्तक्षेप ः

संथाळ लोक ' दामिन ए कोह' क्षेत्रामध्ये कृषीआधारित स्थीर जीवन जगू लागल्यानंतर ते व्यापाराच्या निमित्ताने बाहेरील लोकांशी जोडले गेले . संथाळांनी आपल्या क्षेत्रामध्ये भात शेतीबरोबरच वेगवेगळया व्यापारी पिकांची शेती करण्यास सुरूवात केली होतीआणि त्यामुळे ते व्यापारी आणि सावकार यांच्याशी घेवाण देवाण करू लागले होते . परंतु हळू हळू ब्रिटीशांच्या त्या क्षेत्रातील वाढत्या महसूलामुळे व सावकारांच्या मोठया व्याजदरामुळे संथाळांची जमीन हळू हळू सावकारांच्या (दिकू ) घश्यात चालली होती . त्याचबरोबर जमीनदार लोकही संथाळांच्या जमीनीवर आपली मालकी सांगू लागले होते .

' ब्रिटीशांच्या धोरणांमुळे संथाळांच्या क्षेत्रामध्ये बाहेरलि सावकार,व्यापारी,ठेकेदार इत्यादींचा हस्तक्षेप वाढला . संथाळ लोक या बाहेरील लोकांना ' दिकू' म्हणत असत . हे दिकू लोक संथाळांच्या नजरेत घृणास्पद लोक बनले होते . '[2]

इ . स . 1850 च्या दशकामध्ये संथाळ लोकांची मानसिकता ब्रिटिशांच्या विरोधात उठाव करण्याची बनली होती .

ब्रिटिशांच्या विरोधातील संथाळांचा सशस्त्र उठाव ः

संथाळ लोक ब्रिटिश व त्यांच्या हस्तकांच्या विरोधात एकजूट निर्मान करू लागले होते , ते या सर्वापासून वेगळे व शोषनमुक्त राहू इच्छित होते . संथाळांच्याउठावाच्या कारणांचे विश्लेषण ई . जी . मैने यांनी खूप सविस्तरपणे केले आहे . ते लिहीतात महाजनांकडून वाढलेले शोषण, कर्जाची समस्या पोलीसांचा भ्रष्टाचार, संथाळांची गरीबी आणि ब्रिटिश न्यायालयाकडून संथाळांना न मिळणारा न्याय इ . कारणे या उठावामागे होती . त्याचबरोबर संथाळांच्या उठावामागच्या कारणांचा आढावा 'कलकत्ता रिव्यु'मध्ये पुढीलप्रमाणे छापलेला होता

'जमीनदार, पोलीस,महसूल विभाग आणि न्यायालये 'यांनी संथाळांवर अनंत अत्याचार केले . त्यांची जमीन जायदाद हिसकावून घेतली . पाऊलागणिक संथाळांना अपमानित केले जात होते . आणि मार झोड केली जात होती...... . '[3] याचा परिणाम म्हणजे इ . स . 1854 पर्यंत आदिवासी लोक अन्यायाविरूध्द संघर्ष करण्यासाठी हालचाली करू लागले . त्यांचे प्रमुख बैठका घेवू लागले व उघड उघड संघर्षाची तयारी करू लागले होते . त्याचा परिणाम म्हणून एक दुसया जमीनदार व दलालांना लुटणाया घटना घडू लागल्या . '30 जून 1855रोजी भगनीडीहमध्ये 400 आदिवासी गावांमधील जवळ जवळ 6000 आदिवासी लोक एकत्र आले . तेथे सभा होऊन एकमुखाने निर्णय घेण्यात आला की , बाहेरच्या लोकांना पळवून आणि परकीय सत्ता कायमची संपवून सत्ययुगातील राज्य न्याय आणि धर्मावर आधारित राज्य निर्माण करण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागेल . '[4] संथाळांनी मोठा संघर्ष करण्यासाठी आपल्या जमात बांधवांना एकत्र केले व त्यांनी कलकत्याकडे जाण्याचा निर्धार केला . परंतु जेव्हा त्यांच्याजवळील पैसा आणि अन्नसामग्री संपली तेव्हा त्यांनी मोठया प्रमाणावर लुटपाट सुरु केली . अशा स्थितीमध्ये घाबरलेल्या महाजन लोकांनी पोलीसांच्या मदतीने सिधू कान्हूंना पकडण्याचा प्रयत्न केला . त्यामुळे संतापलेल्या संथाळांनी मानिक मुंडी , दरोगा व पाच लोकांची हत्या केली . या उठावाची बातमी भागलपूरमधील मॅजिस्ट्रेटला 4 जुलै 1855 ला मिळाली, परंतु 9 जुलैपर्यंत संथाळ त्याच्या भागात पोहोचले होते . 19 जुलैपर्यंत इंग्रज अधिकायांनी या उठावाच्या उग्र स्वरूपाला मान्य करून असे सामगितले की, उठाव संग्रामपूर ,पाकुर व वल्लभपूर मध्ये पसरला आहे . या परिसरामध्ये संथाळांनी श्रीमंत लोकांच्या हत्या केल्या आणि त्यांना लुटलेसुध्दा, अनेक युरोपीय लोकांनाही याच स्थितीचा सामना करावा लागला आहे .

संथाळांच्या या संघटित उठावाने ब्रिटिश सरकार खडबडून जागे झाले आणि त्यांच्याशी लढण्यासाठी सैन्याचा आधार घेतला . उठाववाल्या संथाळांचा बिमोड करण्यासाठी मेजर जनरल लॉयडच्या नेतृत्वाखाली 10 तुकडया पाठविल्या,उठाववाल्या भागामध्ये मार्शल लॉ लागू केला गेला आणि विद्रोही नेत्यांना पकडण्यासाठी 10,000 रूपयांचे बक्षिस जाहीर केले, भागलपूरचे कमीशनर ब्राउन आणि मेजर जनरल लॉयड यांनी अत्यंत क्रुरतेने उठाव दडपून टाकला,या दडपशाहीमध्ये 15000 संथाळ मारले गेले व त्यांची गावेच्या गावे जाळून उध्वस्त केली ... '[6]

निष्कर्ष ः

ब्रिटिशांनी भारतावर 150 वर्षे राज्य केले, या 150 वर्षाच्या प्रदीर्घ कालखंडामध्ये त्यांच्या अन्यायी धोरणाविरूध्द ऐतदेशीयांनी वेगवेगळया स्वरूपातून लढे दिले . त्यातील आदिवासी समाजाचा विरोध स्वयंस्फुर्त भावनेतील व प्रखर स्वरूपातील होता . ब्रिटिशांनी भारतातील सत्ता स्थिर झाल्यानंतर महसूलात वाढ करण्यासाठी शेतीक्षेत्र वाढविण्याकडे लक्ष्य वळविले . त्यासाठी जंगलातील आदिवासी समाजाकडे त्यांचे लक्ष वेधले गेले . प . बंगाल राज्यातील राजमहल पर्वतीय क्षेत्रामध्ये शेतीक्षेत्र वाढविण्यासाठी तेथील पहाडी लोकांना त्यांनी प्रोत्साहित केले . परंतु त्यांनी प्रतिसाद न दिल्याने त्या क्षेत्रात संथाळांना जमीनी देवून बसविण्याची प्रक्रिया त्यांनी राबविली . देशाच्या विविध भागातील संथाळ राजमहल क्षेत्रामध्ये वास्तव्य करू लागले . त्यांनी पहाडी आदिवासी लोकांना पराभूत करून तेथून हुसकावून

लावले . संथाळांनी मोठया प्रमाणावर जंगलतोड करून शेतीचे क्षेत्र वाढविले व अशा तहेने ते त्या क्षेत्राच्या बाहेरील लोकांशी व्यापार उद्यीमाच्या निमित्ताने संलग्न झाले . ब्रिटिशांनी राजमहल क्षेत्रातील संथाळ लोकांच्या भागाला 'दामिन ए कोह' नाव दिले . ब्रिटिशांनी त्या क्षेत्रातील जास्तीत जास्त महसूल गोळा करण्यास सुरूवात केली, त्याचा परिणाम म्हणजे संथाळ लोकांच्या जमीनी सावकार ,जमीनदार व महाजन यांच्या घश्यात जाऊ लागल्या .

ब्रिटिशांच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे व सावकार जमीनदारांच्या (दिकू) अन्यायामुळे संथाळ लोक संघर्षाच्या तयारीने एकजूट झाले . त्यांना सिधू व कान्हू यांचे नेतृत्व लाभले . दैवी आदेश ,दैवी चमत्कार व जमातबंधूंच्या ऐक्यतेतून संथाळांनी ब्रिटीश व त्यांच्या हस्तकांच्या विरोधात इ . स . **1855**ते इ . स . **1857**य I I कालखांडात प्रखर संघर्ष केला . हा संघर्ष अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी परिपूर्ण ब्रिटीश फौज व पारंपारिक धनुष्य भाल्यांनी युक्त संथाळ जनता असा होता . अशाप्रकारे हा संघर्ष परस्पर विरोधी टोकाचा असला तरी प्रदीर्घ काळ चालला , कारण संथाळांचे ऐक्य ,संघर्षातील गुप्तता व गनिमी कावा इ . गोष्टी वाखाणण्याजोग्या होत्या . शेवटी ब्रिटीश सैन्याने हा उठाव अत्यंत निर्दयतेने चिरडून टाकला . अमानवतेचे भयानक तांडव ब्रिटीशांनी निर्माण केले . आज शंभर वर्ष उलटून गेली तरी राजमहल पर्वतीय क्षेत्रामध्ये संथाळांच्या वीर गाथा दंतकथांमधून व लोकगीतांमधून जिवंत आहेत .

संदर्भ ग्रंथ सूची ः

**1** . प्रो . विपिन चंद्र, भारत का स्वतंत्रता संघर्ष, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली . इ . स . **2006** पृ . क्र **16**

**2** . सुमित सरकार , अनुवाद सुशीला डोभाल, आधुनिक भारत, राजकमल प्रकाशन, नयी दिल्ली इ . स . **2005** पृ . क्र **63**

**3** . प्रो . विपिन चंद्र, भारत का स्वतंत्रता संघर्ष, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली . इ . स . **2006** पृ . क्र **16**

**4** . उपरोक्त .

**5** . रामलखन शुक्ल , आधुनिक भारत का इतिहास, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली . इ . स . **2003** पृ . क्र **211**

**6** . प्रो . विपिन चंद्र, भारत का स्वतंत्रता संघर्ष, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली . इ . स . **2006** पृ . क्र **17**

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com